# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

**विषय :-शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष मंजूर प्रवेश क्षमतेच्या ४०% व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी १०% ज्यादा विद्यार्थी मागणी प्रस्तावाबाबत.**

दरवर्षी १२ वी परिक्षेत उत्तीर्णतेचे प्रमाण वाढत असलेमुळे कला, वाणिज्य व विज्ञान (बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षाकरीता उपलब्ध विद्यार्थी संख्या विचारात घेता कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये विद्यार्थी प्रवेशाबाबत निर्माण झालेली स्थिती विचारात घेवून विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत यासाठी विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम **(विधी, बी.एड. व बीपीएड वगळून)** आणि पारंपारिक अभ्यासक्रमांकरिता (कला, विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा) कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यासाठी विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. संबंधित महाविद्यालयाच्या प्राप्त प्रस्तावानुसार संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरीता केवळ चालू शैक्षणिक वर्षाकरिता महाविद्यालयास शासन मान्य पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या तुकडीच्या प्रवेश क्षमतेच्या ४०% वाढीव विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता देण्यात येईल.
२. मागील शैक्षणिक वर्षामध्ये ज्या महाविद्यालयांना पारंपारिक पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी मंजुर शेवटच्या तुकडीच्या ४०% जादा विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता देण्यात आली आहे अशा महाविद्यालयांना अनुक्रमे तृतीय व द्वितीय वर्षाकरिता शासन मान्य पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या तुकडीच्या ४०% जादा विद्यार्थी प्रवेशित करणेस मान्यता देण्यात येईल
३. वाढीव विद्यार्थी संख्येनुसार प्रवेश प्रक्रिया राबविताना महाविद्यालयांनी शासनाच्या आरक्षण धोरणांचे तंतोतंत पालन करावे.
४. एकाच शहरात/गावात एकापेक्षा अधिक महाविद्यालये असतील तर नजिकच्या महाविद्यालयाकडून जादा विद्यार्थी प्रवेश संदर्भात संबंधित महाविद्यालयाने खालील तक्त्यामध्ये नमुद अंतराच्या निकषांनुसार संबंधित महाविद्यालयाचे ना-हरकत पत्र सादर करणे आवश्यक आहे.

| शहरांचे वर्गीकरण | दोन महाविद्यालयांमधील अंतर |
|---|---|
| अ. महानगरे- लोकसंख्या २५ लाखपेक्षा जास्त | ०२ कि.मी. |
| ब. महानगरपालिका लोकसंख्या ५ लाख ते १५ लाख | ०३ कि.मी. |
| क. जिल्ह्याचे ठिकाण | ०४ कि.मी. |
| ड. निमशहरी विभाग- लोकसंख्या २ लाख ते ५ लाख | ०५ कि.मी. |
| इ. ग्रामीण भाग | २० कि.मी. |
| फ. आदिवासी व डोंगराळ भाग | १० कि.मी |

- दोन महाविद्यालयात अंतर मोजण्याकरिता संबंधित महाविद्यालयाच्या स्थानास केंद्रबिंदू मानून नजिकच्या महाविद्यालयाच्या अंतराचा परिघ विचारात घ्यावा.

५. संलग्न महाविद्यालयाने मागील शैक्षणिक वर्षात सर्व प्रकारचे संलग्नीकरण शुल्क व विद्यापीठाशी संबंधित अन्य सर्वप्रकारचे शुल्क( अश्वमेध, अग्रणी महाविद्यालय, ई सेवा शुल्क, प्रो रेटा इ.) भरल्याचा पावत्या प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे. जी महाविद्यालये शुल्क भरल्याच्या पावत्या सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांचे कोणतेही प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.
६. पदवी अभ्यासक्रमाकरिता जादा विद्यार्थी प्रवेशित करण्याकरिता मान्यता मागणाऱ्या महाविद्यालयांनी सदर अभ्यासक्रमाकरिता कार्यभारानुसार अर्हताधारक शिक्षक उपलब्ध असल्याची कागदपत्रे व संलग्नता टी-१ विभागाकडून घेतलेली मान्यता अथवा मान्यता घेणार असल्याबाबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.
७. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अतिरिक्त विद्यार्थी संख्या मागणी करणाऱ्या महाविद्यालयांनी सदर अभ्यासक्रमासाठी दोन पुर्णवेळ अर्हताधारक मान्यताप्राप्त शिक्षक **उपलब्ध असल्याची कागदपत्रे** व सदर शिक्षकांची संलग्नता टी-१ विभागाकडून घेतलेली मान्यता अथवा मान्यता घेणार असल्याबाबतचे हमीपत्र सादर करणे **अनिवार्य आहे.**

८. ज्या महाविद्यालयास ४०% वाढीव विद्यार्थी मान्यता देण्यात येणार आहे, अशा महाविद्यालयांनी त्यासाठी लागणा-या पायाभूत सुविधा, शिक्षक यांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे. ही मान्यता संबंधित शैक्षणिक वर्षा पुरतीच मर्यादीत राहील.

९. ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत शासन व विद्यापीठ कोणताही आर्थिक भार उचलणार नाही अथवा शासकीय अनुदान मिळणार नाही याबाबतचे हमीपत्र सादर करावे.

१०. वाढीव विद्यार्थी प्रस्ताव सोबतच्या नमुन्यामध्ये विहीत शुल्कासह प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये २५ जुलै पर्यत विद्यापीठास सादर करावेत.

११. मुदतीनंतर, अपुरे अथवा विलंबाने आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत अथवा सदर प्रस्तावांवर कार्यवाही केली जाणार नाही.

१२. प्रस्तावाच्या नमुन्यामध्येच प्रस्ताव स्वीकारले जातील.

१३. ज्या महाविद्यालयांना मागील शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षाकरीता वाढीव विद्यार्थी क्षमता मंजूर केली आहे त्याची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

१४. पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितिय व तृतिय वर्षाकरिता ४०% जादा विद्यार्थी प्रवेशित करण्याकरिता सदर अभ्यासक्रमाच्या अनुक्रमे प्रथम व द्वितिय वर्षाच्या विद्यार्थ्यांची माहिती खालील तक्त्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | अभ्यासक्रम | वर्ष | प्रवेशित विद्यार्थी | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी | भाग-१ | | | |
| २. | बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी | भाग-२ | | | |

१५. मागील शैक्षणिक वर्षामध्ये ज्या महाविद्यालयांना पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमारिता वाढीव विद्यार्थी संख्या मंजुर करण्यात आली आहे. अशा महाविद्यालयांनी त्याकरिता नेमलेल्या शिक्षकांची माहिती सादर करणे आवश्यक आहे.

१६. ४० टक्के वाढीव विद्यार्थ्यांची १८० शैक्षणिक दिवस तसेच ७५ टक्के हजेरी भरेल याबाबतची दक्षता घेत असल्याबाबतचे प्राचार्यांचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१७. पदवी अभ्यासक्रमाकरिता संबंधित अभ्यासक्रमाच्या शेवटच्या तुकडीत प्रवेश क्षमतेच्या ४०% व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेच्या १०% जादा विद्यार्थी प्रवेशित करण्याकरिता महाविद्यालय विकास समितीचा ठराव सादर करणे आवश्यक आहे.

१८. ज्या महाविद्यालयांची स्थापना होऊन पाच वर्ष पुर्ण झाली आहेत अशा महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१९. पदवी अभ्यासक्रम व व्यावसायिक अभ्याक्रमासाठी मंजूर प्रवेश क्षमतेच्या ४०% व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी १०% जादा विद्यार्थी प्रवेशित करण्याकरिता प्राप्त अर्जाची छाननी करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या समितीने सदर अर्जांची छाननी करून दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता संबंधित महाविद्यालयाने आठ दिवसात करणे बंधनकारक आहे. सदरची त्रुटी पुर्तता विहित मुदतीत झाली नाही तर सदरचा प्रस्ताव अपात्र ठरवण्यात येईल

२०. महाविद्यालयांनी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अनुकमे ४०% व १०% जादा विद्यार्थी प्रवेशासाठी प्रस्ताव सादर केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने मुद्येनिहाय पुरावा कागदपत्रे प्रस्तावास जोडून पुर्तता सादर केल्यानंतरच याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल

**१. संलग्न महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता वार्षिक संलग्नीकरण शुल्क, व विद्यापीठाशी संबंधित अन्य सर्वप्रकारचे शुल्क भरल्याचा पावत्या प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे. जी महाविद्यालये शुल्क भरल्याच्या पावत्या सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांचे कोणतेही प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

**२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ मधील तदतुदीनुसार महाविद्यालय विकास समितीची माहिती सादर करणे आवश्यक आहे.**

**३. ज्या महाविद्यालयास ४०% वाढीव विद्यार्थी मान्यता देण्यात येणार आहे, अशा महाविद्यालयांनी त्यासाठी लागणा-या पायाभूत सुविधा, शिक्षक यांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे. ही मान्यता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पुरतीच मर्यादीत राहील आणि या पोटी शासन व विद्यापीठ कोणताही आर्थिक भार उचलणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.**

...३

टिप :- १) बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. या अभ्यासक्रमाच्या ४०% ज्यादा विद्यार्थी संख्येच्या मान्यतेसाठी रू. १५००/- व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १०% व व्यावसायिक (बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स (एंटायर), बी.सी.ए. बी.डेस.) अभ्यासक्रमांच्या ४०% ज्यादा विद्यार्थी संख्येच्या मान्यतेसाठी रु.२०००/- प्रस्ताव शुल्क स्वतंत्रपणे आकारण्यात येईल.

२) ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत शासकीय अनुदान मिळणार नाही, याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

३) वाढीव विद्यार्थी प्रस्ताव सोबतच्या नमुन्यामध्ये विहीत शुल्कासह दि.२४/०७/२०२६पर्यंत विद्यापीठास सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही केली जाणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

४) अपुरे अथवा विलंबाने आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

५)जवळच्या अनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या भरलेनंतरच विनाअनुदानित महाविद्यालयाने पदवी अभ्यासक्रमासाठी ४०% व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी १०% विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता देण्यात येईल.

६) मान्यताप्राप्त पुर्णवेळ किमान २ शिक्षक प्रती प्रोग्रॅम नियुक्त केले नंतरच विद्यार्थी संख्या वाढ, नवीन तुकडीचे प्रस्ताव स्वीकारण्यात येतील.

७) सोबत प्रस्तावाचा नमुना दिलेला आहे. फक्त त्याच नमुन्यामध्येच प्रस्ताव स्वीकारले जातील.

८) ज्या महाविद्यालयांना मागील शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षाकरीता वाढीव विद्यार्थी क्षमता मंजूर केली आहे त्याची प्रत सोबत जोडावी.

कळावे.

आदेशान्वये

(श्री.. दिपक द. अडगळे)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ Nc 1 2 6 4 /
दि. 14 JUL 2026
प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

F:\23.04.2021\sm\sm\2024-25\Temp Division\Submission1.docx

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -
प्रति,
मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - प्रथम वर्षाच्या जादा विद्यार्थी मान्यतेबाबत.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०    - २०    साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांच्या **प्रथम वर्षाकरिता ज्यादा विद्यार्थ्यांची आवश्यकता** आहे.

| १ | **संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव :-** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अभ्यासक्रमाचे नाव** | **अभ्यासक्रमाचे वर्ष** | **शासनमान्य मंजूर तुकडी** | | **मंजूर विद्यार्थी संख्या** | | **प्रस्ताव प्रकार** | **भरणा केलेल्या शुल्काचा तपशील (रू.)** |
| | | | **अनुदानित** | **विना अनुदानित** | **अनुदानित** | **विना अनुदानित** | **४०% जादा विद्यार्थी** | |
| | **बी.ए.** | | | | | | | |
| | **बी.कॉम.** | | | | | | | |
| | **बी.एस्सी.** | | | | | | | |

| २ | **सादर केलेली कागदपत्रे -** |
|---|---|
| i) | प्रवेश नियमावली मधील अंतराच्या निकषाबाबत लागू असणाऱ्या मुद्यानुसार नजिकच्या सर्व सबंधित महाविद्यालयामधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी असलेल्या मंजूर प्रवेश क्षमतेवर परिणाम होणार नसल्याबाबत महाविद्यालयाचा ना-हरकत दाखला. |
| ii) | पदवी अभ्यासक्रमाकरिता जादा विद्यार्थी प्रवेशित करण्याकरिता मान्यता मागणाऱ्या महाविद्यालयांनी सदर अभ्यासक्रमाकरिता कार्यभारानुसार अर्हताधारक शिक्षक उपलब्ध असल्याची कागदपत्रे व संलग्नता टी-१ विभागकडून घेतलेली मान्यता अथवा मान्यता घेणार असल्याबाबतचे हमीपत्र गतवर्षी सदर अभ्यासक्रमासाठी जादा विद्यार्थी संख्येसाठी शिक्षक भरलेची माहिती |
| iii) | ज्या महाविद्यालयास ४०% वाढीव विद्यार्थी मान्यता देण्यात येणार आहे, अशा महाविद्यालयांनी त्यासाठी लागणा-या पायाभूत सुविधा, शिक्षक यांची उपलब्धता असल्याबाबत संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. |
| iv) | ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत भविष्यात शासकीय अनुदान मागणी करण्यात येणार नाही याबाबत रू. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. |
| v) | संलग्न महाविद्यालयाने सर्व प्रकारचे संलग्नीकरण शुल्क व विद्यापीठाशी संबंधित अन्य सर्वप्रकारचे शुल्क(अश्वमेध, अग्रणी महाविद्यालय, ई सेवा शुल्क, प्रो राटा इ.) भरल्याचा पावत्या (चालू शैक्षणिक वर्षातील) |
| vi) | **४० टक्के वाढीव विद्यार्थ्यांची १८० शैक्षणिक दिवस तसेच ७५ टक्के हजेरी भरेल याबाबतची दक्षता घेत असल्याबाबतचे हमीपत्र** |
| vii) | **पदवी अभ्यासक्रमाकरिता संबंधित अभ्यासक्रमाच्या शेवटच्या तुकडीत प्रवेश क्षमतेच्या ४०% व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेच्या १०% जादा विद्यार्थी प्रवेशित करण्याकरिता महाविद्यालय विकास समितीचा ठराव** |
| viii) | ज्या महाविद्यालयांची स्थापना होऊन पाच वर्ष पुर्ण झाली आहेत अशा महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन प्रमाणपत्र |

उपरोक्त प्रस्तावास विद्यापीठ मान्यता मिळावी ही विनंती.

आपला विश्वासू,
प्राचार्य,
(सही व शिक्का)

**टिप - उपरोक्त नमुना फक्त बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. करिताच वापरावयाचा आहे.**

# प्रस्तावाचा नमुना

संदर्भ -
प्रति,
मा. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय - द्वितीय/तृतीय वर्षाच्या जादा विद्यार्थी मान्यतेबाबत.

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०  -२०  मध्ये आमच्या महाविद्यालयाना खाली नमूद केलेनुसार प्रथम वर्षाच्या मंजूर शेवटच्या तुकडीच्या ४०% विद्यार्थी प्रवेशक्षमता वाढ मान्यता मिळाली होती. यानुसार सदरचे विद्यार्थी उत्तीर्ण झालेने शैक्षणिक वर्ष २० -२० साठी आमच्या महाविद्यालयामधील खालील अभ्यासक्रमांच्या **द्वितीय वर्षाकरिता प्रवेशास पात्र झाले आहेत. तसेच सन २०  - २० मध्ये द्वितीय वर्षामधील विद्यार्थी उत्तीर्ण होवून तृतीय वर्षाकरीता प्रवेशास पात्र झाले आहेत. सबब, आम्हास ४०% जादा विद्यार्थी मिळणे आवश्यक आहे.**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव :-** | | | | | | | |
| | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्सासक्रमाचे वर्ष | शासनमान्य मंजूर तुकडी | | मंजूर विद्यार्थी संख्या | | प्रस्ताव प्रकार | भरणा केलेल्या शुल्काचा तपशील (रू.) |
| | | | अनुदानित | विनाअनुदानित | अनुदानित | विनाअनुदानित | ४०% जादा विद्यार्थी | |
| | **बी.ए.** | | | | | | | |
| | **बी.कॉम.** | | | | | | | |
| | **बी.एस्सी.** | | | | | | | |

| | |
|---|---|
| २ | **सादर केलेली कागदपत्रे -** |
| i) | प्रवेश नियमावली मधील अंतराच्या निकषाबाबत लागू असणाऱ्या मुद्यानुसार नजिकच्या सर्व संबंधित महाविद्यालयामधील उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी असलेल्या मंजूर प्रवेश क्षमतेवर परिणाम होणार नसल्याबाबत महाविद्यालयाचा ना-हरकत दाखला. |
| ii) | पदवी अभ्यासक्रमाकरिता जादा विद्यार्थी प्रवेशित करण्याकरिता मान्यता मागणाऱ्या महाविद्यालयांनी सदर अभ्यासक्रमाकरिता कार्यभारानुसार अर्हताधारक शिक्षक उपलब्ध असल्याची कागदपत्रे व संलग्नता टी-१ विभागकडून घेतलेली मान्यता अथवा मान्यता घेणार असल्याबाबतचे हमीपत्र गतवर्षी सदर अभ्यासक्रमासाठी जादा विद्यार्थी संख्येसाठी शिक्षक भरलेची माहिती |
| iii) | **ज्या महाविद्यालयास ४०% वाढीव विद्यार्थी मान्यता देण्यात येणार आहे, अशा महाविद्यालयांनी त्यासाठी लागणा-या पायाभूत सुविधा, शिक्षक यांची उपलब्धता** असल्याबाबत संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. |
| iv) | ज्यादा विद्यार्थी प्रवेशाबाबत भविष्यात शासकीय अनुदान मागणी करण्यात येणार नाही याबाबत रू. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्था अध्यक्ष किंवा सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र. |
| v) | संलग्न महाविद्यालयाने सर्व प्रकारचे संलग्नीकरण शुल्क व विद्यापीठाशी संबंधित अन्य सर्वप्रकारचे शुल्क(अश्वमेध, अग्रणी महाविद्यालय, ई सेवा शुल्क, प्रो राटा इ.) भरल्याचा पावत्या (चालू शैक्षणिक वर्षातील) |
| vi) | **४० टक्के वाढीव विद्यार्थ्यांची १८० शैक्षणिक दिवस तसेच ७५ टक्के हजेरी भरेल याबाबतची दक्षता घेत असल्याबाबतचे हमीपत्र** |
| vii) | **पदवी अभ्यासक्रमाकरिता संबंधित अभ्यासक्रमाच्या शेवटच्या तुकडीत प्रवेश क्षमतेच्या ४०% व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेच्या १०% जादा विद्यार्थी प्रवेशित करण्याकरिता महाविद्यालय विकास समितीचा ठराव** |
| viii) | **ज्या महाविद्यालयांची स्थापना होऊन पाच वर्ष पुर्ण झाली आहेत अशा महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन प्रमाणपत्र** |

उपरोक्त प्रस्तावास विद्यापीठ मान्यता मिळावी ही विनंती.

आपला विश्वासू,

प्राचार्य,
(सही व शिक्का)

**टिप - उपरोक्त नमुना फक्त बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. करिता वापरावयाचा आहे.**

# हमीपत्र

प्रमाणित करण्यात येते की मी प्राचार्य --------------------------अशी हमी देतो की--------
----------------------- या महाविद्यालयात---------------------------- या वर्गासाठी सन २० - २० या शैक्षणिक वर्षासाठी सदर वर्गाच्या शेवटच्या तुकडीच्या प्रवेश क्षमतेच्या ४०% वाढीव विद्यार्थी संख्या मागणी केलेली आहे. सदर वाढीव विद्यार्थी संख्येसाठी विद्यापीठाकडे अथवा शासनाकडे शासकीय अनुदानासाठी वेतन/वेतनेतर खर्चासाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मागणार नाही अशी मी याद्वारे हमी देत आहे.

प्राचार्य